पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२८६/२०२०
दिनांक : १६/१०/२०२०

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीच्या सभापती नेमणुकीबाबतचे परिपत्र सोबत पाठविले आहे.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

**<u>फक्त मा.विधी समिती सदस्यांकरिता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
दिनांक : १६/१०/२०२०

**----- परिपत्र -----**

**विषय - मा.विधी समितीच्या सभापती नेमणुकीबाबत....**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे, सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम क्र.२(१) व (२) अन्वये मा.विधी समितीची पहिली (विशेष) सभा भरवणेकामी **शुक्रवार** दिनांक **२३/१०/२०२०** हा दिवस निश्चित करणेत आला आहे. या सभेची कार्यपत्रिका आपणाकडे आलाहिदा पाठविणेत येत आहे.

मा.विधी समितीचे सभापती यांची नेमणूक दि.**२३/१०/२०२०** रोजी भरणा-या तिच्या पहिल्या (विशेष) सभेत होईल.

मा.विधी समितीच्या सभापती पदासाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे ठरविला आहे.

| **अ.क्र.** | **समितीचे नांव** | **पद** | **नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा दिनांक व वेळ** |
|---|---|---|---|
| १ | **मा.विधी समिती** | **सभापती** | **दिनांक १९/१०/२०२०<br>दुपारी ३.०० ते ५.००** |

नामनिर्देशन पत्राचे फॉर्म्स नगरसचिव कार्यालयात कार्यालयाच्या वेळेत मिळतील.

नामनिर्देशन पत्र संपूर्णपणे भरुन ते नगरसचिव यांना त्यांच्या कार्यालयात ठरलेल्या दिवशी व वेळेत द्यावे अशी विनंती आहे.

मा.कळावे,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२९१/२०२०
दिनांक : १६/१०/२०२०

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली (विशेष) सभा दिनांक **२३/१०/२०२०** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली (विशेष) सभा **शुक्रवार** दिनांक **२३/१०/२०२०** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०९ सप्टेंबर २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती ( विशेष सभा )**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०१**

**दिनांक : २३/१०/२०२०** **वेळ : स.११.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली सभा (विशेष सभा) **शुक्रवार** दिनांक **२३/१०/२०२०** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधी दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

**विषय क्र.१) मा.विधी समितीच्या सभापतींची नेमणूक करणे.**

( टिप - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) मुळ नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ मधील नियम क्र.४ अन्वये " विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी संबंधित विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल जो अतिरिक्त आयुक्तांच्या कमी दर्जाचा नसावा " अशी तरतूद आहे.)



(उल्हास बबनराव जगताप)

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/२९१/२०२०

दिनांक : १६/१०/२०२० चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.